


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : २९७ वा सोमवार दि ०९ फेब्रुवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# औद्योगिक क्षेत्रातील गुंडशाही खपवून घेणार नाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा

**वृत्तसंस्था/मुंबई**

अहिल्यानगर: राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण वेगाने सुरू असताना औद्योगिक क्षेत्रातील झुंडशाही, गुंडशाही आणि उद्योजकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्ती अजिबात खपवून घेतल्या जाणार नाहीत. सुपा औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना त्रास देणारे काही वाईट उद्योग सुरू असल्याची माहिती मिळाली असून, अशा घटकांना कायद्याने ठोकून काढले जाईल, असा ठाम आणि स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. अहिल्यानगरपुणे महामार्गावरील सुपा (ता. पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील खाजगी औद्योगिक प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार काशिनाथ दाते, आमदार बबनराव पाचपुते, हभप नामदेवशास्त्री, हभप महंत शिवाजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पारनेरसारख्या भागात नवे औद्योगिक इकोसिस्टिम उभे राहत असताना जसे चांगले लोक येतात, तसे काही वाईट लोकही तयार होतात. उद्योजकांना धमकावणे, अडथळे निर्माण करणे, खंडणीसारखे प्रकार करण्याचे प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वी अशा लोकांचा बंदोबस्त केला असून, आता पुन्हा कोणी हिम्मत केली तर त्याला स्पेअर केले जाणार नाही. इज ऑफ डूइंग बिझनेस कॉस्ट ऑफ डूइंग बिझनेस आणि कायदा-सुव्यवस्था या तीन गोष्टी उद्योगाच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मुख्यमंत्री म्हणाले की, पुढील पाच वर्षे औद्योगिक विजेचे दर वाढणार नाहीत; उलट ते कसे कमी होतील यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यावरही भर दिला जात आहे. कायद्याच्या अंमलबजावणीबाबत ठाम भूमिका मांडताना त्यांनी सांगितले की औद्योगिक क्षेत्रातील अगदी छोटी घटना सुद्धा गंभीरपणे घेतली जाईल. जिल्हा पोलीस अधीक्षकांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. कोणीही उद्योजकांना त्रास दिला तर कायद्याने ठोकून काढायचे. ठोकून काढू याचा अर्थ हिंसा नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत अत्यंत कठोर कारवाई असा आहे. नागरिकांना उद्योगांकडून त्रास होत असल्यास त्यांनी अधिकृत नियामक यंत्रणेकडे दाद मागावी, असे आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले की, अनैतिक प्रथा असतील तर रेग्युलेटर कारवाई करेल; पण झुंडशाही, दादागिरी आणि गुंडगिरी



महाराष्ट्रातील कोणत्याही एमआयडीसीत खपवून घेतली जाणार नाही. जोपर्यंत भरतसारखे प्रामाणिक उद्योजक आमच्यासोबत आहेत, तोपर्यंत महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती कोणीही थांबवू शकणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# राजकारणात मोठ्या हालचाली घडण्याची शक्यता, उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर जाणार? संख्याबळ काय सांगतं?

**वृत्तसंस्था/चंद्रपूर**

महाराष्ट्राचे माजी मुख्यणंत्री तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा विधान परिषदेचा कार्यकाळ लवकरच संपणार आहे. उद्धव ठाकरे यांचा विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा कार्यकाळ हा १३ मे २०२६ ला संपणार आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर जाणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात होऊ लागली आहे. विशेष म्हणजे यावर प्रतिक्रियादेखील येऊ लागल्या आहेत. उद्धव ठाकरे यांच्यासह विधान परिषदेतील ९ आमदारांचा कार्यकाळ हा लवकरच संपणार आहे. त्यामुळे विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडे पुरेसं संख्याबळ नसल्याने त्यांची कोंडी होणार असल्याचं चित्र आहे. संख्याबळाच्या कमतरतेमुळे उद्धव ठाकरे यांच्यासाठी विधान परिषदेची निवडणूक जिंकणं हे मोठं आव्हान असणार आहे. विशेष म्हणजे संख्याबळ पाहता विधान परिषदेच्या ९ जागांपैकी महाविकास आघाडीला केवळ एकच जागेवर यश मिळू शकतं. ती एक व्यक्ती उद्धव ठाकरे असतील का? ते पाहणं आता महत्त्वाचं आहे. उद्धव ठाकरे हे स्वत: विधान परिषदेवर जाणार की दुसऱ्या कुणाला संधी देणार? ते पाहणं देखील महत्त्वाचं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी देखील याबाबतच्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली. ङ्घङ्घउद्धव ठाकरे यांना विधीमंडळात जाण्यासाठी आता मध्ये कुठली निवडणूक नाही. विधीमंडळात जायचंच असेल तर विधानसभेचं मागचं दार ज्याला म्हणतात त्या विधान परिषद निवडणुकीचा पर्याय त्यांना आहे. मला वाटतं ते त्या मार्गाने परत विधान परिषदेवर जातील. संख्याबळाचं गणितं पााहता इतर पक्षांनी त्यांना पाठिंबा दिला तर ते विधान परिषदेत जातीलङ्घङ्घ, अशी प्रतिक्रिया संजय शिरसाट यांनी दिली. विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संख्याबळ पाहिलं तर महायुतीकडे २३५ आमदार आहेत. त्यामुळे महायुतीचे ७ आमदार सहज निवडणुकीत जिंकून येण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीकडे माकप आणि शेकापचे पकडून ४८ आमदार आहेत. तसेच अन्य दोन पक्षांचेदेखील आमदार आहेत. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडे विधानसभेचे २० सदस्य आहेत. त्यांनी राज्यसभा निवडणुकीत एका जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार किंवा काँग्रेसला पाठिंबा दिला तर उद्धव ठाकरे विधान परिषदेवर जाऊ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.



# ...विकास-वित्तीय शिस्तीचे संतुलन...

केंद्र सरकारचा भांडवली खर्च २०२५-२६च्या सुधारित अंदाजातील १०.९६ लाख कोटी रुपयांवरून २०२६-२७ मध्ये १२.२१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. एकंदरीत प्रभावी भांडवली खर्च (४.९ लाख कोटीं अनुदानासह) विक्रमी १७.१५ लाख कोटींवर गेला आहे. यामध्ये राज्य व स्थानिक संस्थांना भांडवली निर्मितीसाठी ४.९३ लाख कोटींचे अनुदान दिले गेले आहे. त्यामुळे केंद्र-राज्य समन्वय अधिक मजबूत झाला असून, राज्यांना मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध होईल. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, सार्वजनिक भांडवली खर्च २०१४-१५ मध्ये दोन लाख कोटींवरून २०२५-२६ मध्ये ११.२ लाख कोटींवर पोहोचला आहे. २०२६-२७ मध्ये तो १२.२ लाख कोटींवर नेण्याचा प्रस्ताव आहे. हा खर्च अंदाजित जीडीपीच्या ४.४ टक्के इतका आहे. हा आकडा आतापर्यंतचा सर्वाधिक आहे. यामुळे ७ टक्क्यांपेक्षा जास्त आणि सलग वाढ साध्य करण्यासाठी सार्वजनिक भांडवली खर्च नायकाच्या भूमिकेत असल्याचे अधोरेखित होते. भारताच्या विकास धोरणात पायाभूत सुविधा कायम केंद्रस्थानी राहिल्या आहेत. सन २०१५पासून सार्वजनिक भांडवली खर्च सातत्याने वाढत असून, अलीकडील वर्षांत त्याला अधिक गती मिळाली आहे. रस्ते, रेल्वे, बंदरे, ऊर्जा, विमान वाहतूक आणि डिजिटल पायाभूत सुविधा यामधील मोठ्या प्रमाणावरील गुंतवणुकीमुळे संपर्कक्षमता मजबूत झाली आहे, क्षमता विस्तारली आहे आणि लॉजिस्टिक्स कार्यक्षमता सुधारली आहे. यामुळे आर्थिक वाढ व उत्पादनक्षमतेसाठी अगदी सक्षम गुणक निर्माण झाले आहेत, असे आर्थिक सर्वेक्षणाने नमूद केले आहे. पायाभूत सुविधांवरील भांडवली खर्चाचा अर्थव्यवस्थेवर अत्यंत सकारात्मक परिणाम होतो. २०२५-२६च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, पायाभूत सुविधा उभारणीसाठी खर्च केलेल्या प्रत्येक एक रुपयामागे देशाचा जीडीपी २.५ ते ३.५ने वाढतो.

अर्थात मोठ्या खर्चासाठी लागणारे भांडवल म्हणजे २०२६-२७च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने एकूण १७.२ लाख कोटींचे स्थूल कर्जउभारणीचे लक्ष्य निश्चित केले आहे. यापैकी निव्वळ बाजार कर्जउभारणी ११.७ लाख कोटी इतकी अपेक्षित आहे. ही आकडेवारी वित्तीय शिस्तीच्या स्पष्ट प्रवासाला अधोरेखित करते, कारण राजकोषीय तूट ही गेल्या वर्षातील ४.४ टक्क्यांवरून २०२६-२७ मध्ये ४.३ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. जरी तूट कमी झाली असली तरी स्थूल कर्जउभारणी अपेक्षेपेक्षा जास्त आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे ५.५ लाख कोटींच्या मोठ्या परतफडीची जबाबदारी. या परतफेडीमुळे सरकारला अतिरिक्त निधी उभारावा लागेल, ज्यामुळे बाजारातील बाँड्सचा पुरवठा वाढेल आणि यामुळे बाँड बाजारावर दबाव येईल आणि व्याजदर देखील किंचित वाढतील अशी शक्यता नाकारता येत नाही. तरीही, राजकोषीय तूट कमी होत असल्याने दीर्घकालीन दृष्टीने अर्थव्यवस्था अधिक स्थिर व विश्वासार्ह बनत आहे. या अर्थसंकल्पात भविष्यवेधी पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. २०२६-२७च्या अर्थसंकल्पात वाहतूक क्षेत्राला सर्वाधिक प्राधान्य दिले असून, रेल्वेसाठी २.७७ लाख कोटी रुपये आणि रस्ते विकासासाठी २.७५ लाख कोटींची विक्रमी तरतूद केली आहे. संरक्षण क्षेत्राचा भांडवली खर्च मागील वर्षाच्या तुलनेत १७.६ टक्क्यांने वाढवून २.१९ लाख कोटी रुपये करण्यात आला आहे, ज्यामुळे नवीन विमाने आणि उपकरणांच्या खरेदीला वेग येईल. ग्रामीण विकासांतर्गत थेट भांडवली खर्च कमी असला तरी, पंतप्रधान आवास योजना (पीएमएवाय) आणि ग्राम सडक योजनेद्वारे (पीएमजीएसवाय) ग्रामीण भागात मालमत्ता निर्मितीसाठी अनुदानावर भर देण्यात आला आहे. तसेच, ऊर्जा क्षेत्रात अणुऊर्जा प्रकल्प, ग्रीन हायड्रोजन मिशन आणि सौरऊर्जेसाठी (पीएम-सूर्यघर) विशेष तरतूद करण्यात आली असून, या क्षेत्रातील मोठी गुंतवणूक सरकारी कंपन्यांच्या माध्यमातून अपेक्षित आहे याशिवायही काही महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी, केंद्रीय सार्वजनिक कंपन्यांच्या मालमत्तांचा आरईआयटीद्वारे पुनर्वापर, नवीन मालवाहतूक कॉरिडॉर (डांकुनी-सुरत), २० राष्ट्रीय जलमार्ग, किनारी मालवाहतूक प्रोत्साहन योजना (२०४७ पर्यंत ६ टक्क्यांवरून १२ टक्के वाटा), सी-प्लेन व्हीजीएफ, राज्यांसाठी २ लाख कोटी रुपयांची एसएएससीआय योजना, आणि पूर्वोदय योजना (ईस्ट कोस्ट इंडस्ट्रियल कॉरिडॉर) या त्यातील काही महत्त्वाच्या घोषणा. ङ्गऑपरेशन सिंदूरफ्नंतर भारताने संरक्षण क्षेत्रातील आधुनिकीकरणाला प्राधान्य दिले आहे. या संघर्षाने सुरक्षा वातावरणात नवे आव्हान निर्माण केले असून, त्याला उत्तर म्हणून संरक्षण खर्चात ही मोठी वाढ करण्यात आली आहे. भांडवली खर्चाची तरतूद एकटीच २.१९ लाख कोटी रुपये इतकी असून, त्यातील प्रमुख वाटप लढाऊ विमाने, नौदल ताफा, पाणबुड्या तसेच स्वदेशी संरक्षण उत्पादनासाठी करण्यात आले आहे. शहरीकरणाला नवा दृष्टिकोन ङ्गसिटी ईकॉनॉमिक रीजन्सफ्द्वारे मिळतो. टियर दोन व तीनची शहरे व मंदिरनगरींसाठी प्रत्येकी पाच हजार कोटींचा निधी पाच वर्षांत दिला जाणार आहे. तसेच ७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर (उदा. मुंबई-पुणे, दिल्ली-वाराणसी) प्रस्तावित आहेत. अर्थसंकल्पात पुढील पाच वर्षांसाठी कार्बन कॅप्चर, युटिलायझेशन आणि स्टोरेज (सीसीयूएस) तंत्रज्ञानासाठी २०,००० कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. ही गुंतवणूक रसायन, ऊर्जा, पोलाद, सिमेंट आणि रिफायनरी या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये केली जाणार आहे. हरित उपक्रम म्हणून सीसीयूएस तंत्रज्ञान कार्बन डायऑक्साइडचे संकलन करून त्याचा पुनर्वापर किंवा सुरक्षित साठवणूक करते, ज्यामुळे औद्योगिक प्रदूषण कमी होऊन शाश्वत विकासाला चालना मिळते. लिथियम-आयन सेल्स, सोलर ग्लास, न्यूक्लियर वस्तू व महत्त्वाच्या खनिज प्रक्रियेसाठी करात सूट दिली आहे. या अर्थसंकल्पात निर्गुंतवणुकीस स्वतंत्र लक्ष्य न देता तीस ङ्गइतर प्राप्तीफ्त ८०,००० कोटींवर समाविष्ट केले आहे. ही २.४ पट वाढ असून, पीएसयू बँकांतील हिस्सेविक्री, धोरणात्मक खासगीकरण (आयडीबीआय बँक, शिपिंग कॉर्प), आणि मालमत्ता चालनीकरण यावर आधारित आहे. अर्थमंत्र्यांनी गुणवत्तापूर्ण अंमलबजावणीवर भर दिला आहे, तेही वेळेत पूर्ण होणाऱ्या, मूल्यवर्धक प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करून.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा शिलेदार सत्तेत सहभागी होणार महायुतीला साथ देण्याचा निर्णय

**मुंबई :** उपमुख्यमंत्रिपदी असताना विमान अपघातात निधन झालेले ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या निधनानंतर राजकीय वतुर्ळात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे विलीनकरण होण्याच्या चर्चांना उधाण आले आहे. त्यानंतर सध्या राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षात असलेले नेते थेट महायुती सरकारच्या सत्तेत सहभागी होण्याची चर्चा रंगली आहे. याची सुरुवात मुंबई महापालिकेत झाल्याचं पाहायला मिळत आहे.बई महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंच्या साथीने निवडणूक लढलेल्या शरद पवार ंच्या राष्ट्रवादीचा एकमेव विजयी उमेदवार सत्तेच्या दिशेने निघाला आहे. योगायोग म्हणजे त्यांच्या नावातही 'अजित' आहे. बीएमसी निवडणुकीत तुतारी



फुंकणाऱ्या माणसाच्या चिन्हावर विजयी झालेले शरद पवार गटाचे नगरसेवक अजित रावराणे यांनी शिवसेना-भाजप महायुतीला साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. '' एक वृत्तवाहिनीने यासंदर्भात वृत्त दिले आहे.मुंबई महापालिकेत भाजपने वेगळा गट स्थापन केला आहे, तर शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने एकत्र गट स्थापन केला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने मनसे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षांसोबत युती करत एकत्र निवडणूक लढवली होती. मात्र निकालानंतर शरद पवारांच्या एकमेव नगरसेवकाने सत्तेच्या दिशेने कूच केली आहे.शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या गटाला पाठिंबा देण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. निधीची कमतरता भासणार नाही, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्यामुळे त्यांच्या शिवसेनेला समर्थन देत असल्याचं रावराणे म्हणाल्याची माहिती आहे. निर्णय घेण्याआधी वरिष्ठांशी चर्चा केल्याचंही ते म्हणाले. भविष्यात मुंबई महापालिकेतील एखाद्या समितीवर त्यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे. दरम्यान, मुंबई महापालिका निवडणुकीनंतर महापौर कोणाचा होणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे. महायुतीकडून यावर शिक्काम ोर्तब झालेले नाही. भाजप आणि शिवसेना उबाठाकडून स्थायी समिती अध्यक्ष, सुधार, शिक्षण, बेस्ट समितीसह अन्य समितींवरील अध्यक्षपद मिळवण्यासाठी चढाओढ आहे. यावर दोन्ही पक्षांत अंतिम निर्णय झालेला नाही. तीन नगरसेवक निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेऊन स्थायी आणि सुधार समितीसह आणखी स्वीकृत नगरसेवक मिळवण्यासाठी नवीन समीकरण जुळवली जात आहेत.

## सोलापूरमध्ये सभागृहाच्या पहिल्याच दिवशी नगरसेवकांत शाब्दिक चकमक

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भाजपने अभूतपूर्व यश प्राप्त केल्यानंतर सोलापूर महापौरपदी भाजपचे विनायक कोंड्याल यांची बिनविरोध निवड झाली आहे. शिवसेनेचे प्रियदर्शन साठे आणि एमआयएमचे तौफिक हतुरे यांनी शेवटच्या मिनिटात माघारी घेतल्याने पीठासीन अधिकारी यांनी बिनविरोध झाल्याची घोषणा केली आहे.समान निधी देण्याच्या शब्दावर माघारी घेत असल्याची प्रतिक्रिया शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदें यांनी दिली. उपमहापौरपदी ज्ञानेश्वरी देवकर यांची सुद्धा बिनविरोध निवड झाली आहे. सोलापूर महानगरपालिकेत भाजप ८७ नगरसेवकांमुळे सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला असून एमआयएमचे ८ नगरसेवक नगरसेवक म्हणून सभागृहात दाखल झाले आहेत. सोलापूर महानगरपालिका सभागृहात १०२ नगरसेवकांपैकी काँग्रेसचे फक्त दोनच नगरसेवक निवडून आले आहेत. एकेकाळी एकहाती सत्ता असलेल्या काँग्रेसवर फक्त दोनच नगरसेवक घेऊन बसण्याची वेळ काँग्रेसवर आली आहे. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या एमम



आयएम पक्षाकडे विरोधी पक्ष जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.महापौरपदाची निवडणूक होऊ नये, बिनविरोध महापौर व उपमहापौर व्हावा यासाठी भाजपचे नगरसेवक शिवसेना नगरसेवक अमोल शिंदें आणि एमआयएमचे गटनेते वाहिदा शेख यांची मनधरणी करत होते. समान निधी देण्याच्या शब्दावरून माघार घेत आहोत,अशी प्रतिक्रिया अमोल शिंदें यांनी दिली आहे.दरम्यान, पालकमंत्री जय कुमार गोरे यांच्या प्रवेशा नंतर महापौर आणि उपमहापौर यांचा सत्कार होईल,अशी भूमिका भाजपची होती. त्यावरुन विरोधक आणि सत्ताधारी यांच्या नेत्यांमध्ये यावेळी मोठी शाब्दिक चकमक झाल्याची पाहायला मिळाली. यानंतर भाजपची एकाधिकारशाही खूप वाढली आहे ते चालू देणार नाही अशी भूमिका शिवसेना नगरसेवक अमोल शिंदे यांनी मांडली.

## आज एकच विचारतो, आम्ही कुठे कमी पडलो?

**नाशिक :** नाशिकमध्ये उपमहापौरपदी शिंदेसेनेच्या विलास शिंदे यांची निवड झाल्यानंतर पक्षातील नाराजीनाट्य समोर आले आहे. शिंदेसेनेकडून नाशिक महापालिकेच्या उपमहापौरपदासाठी इच्छुक असलेल्या प्रवीण तिदमे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट जारी करत आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली आहे.नाशिकमध्ये आज महापौर, उपमहापौरपदाची निवडणूक पार पडली. महापौरपदी भाजप च्या हिमगौरी आडके, उपमहापौरपदी शिंदेसेनेच्या विलास शिंदे यांची निवड करण्यात आली. शिंदेसेनेकडून उपमहापौर पदासाठी इच्छुक असलेल्या प्रवीण तिदमे यांनीदेखील उपमहापौरपदासाठी आपला अर्ज दाखल केला होता. मात्र ऐनवेळी भाजप आणि शिंदेसेनेची आणि भाजपची युती झाली आणि उपमहापौरपदासाठी शिंदेसेनेच्या विलास शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. उपमहापौर पदासाठी इच्छुक असलेले भाजपचे मच्छिंद्र सानप आणि शिंदेसेनेचे प्रवीण तिदमे यांनी माघार घेतल्याने विलास शिंदे बिनविरोध विजयी झाले.असे असले तरी मात्र शिंदेसेनेतील अंतर्गत नाराजीनाट्य आता समोर आले आहे. त्याला कारण म्हणजे शिंदेसेनेचे नाशिकचे महानगर प्रमुख प्रवीण तिदमे यांनी सोशल मीडियावर केलेली पोस्ट आहे.

## काँग्रेसमधील २७ नगरसेवक एकत्र ; पालिकेतील सत्ता 'हाता'त राहणार

**नागपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेतील राजकीय अस्थिरतेला पूर्णविराम मिळाल्याचे चित्र आज स्पष्ट झाले. गेले अनेक दिवस चर्चेत असलेला काँग्रेस पक्षाचा गट नोंदणीचा वाद अखेर संपुष्टात आला असून काँग्रेसच्या सर्व २७ नगरसेवकांनी अधिकृतरित्या एकत्र येत नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात गट नोंदणी पूर्ण केली. या प्रक्रियेदरम्यान राजेश अडूर यांची काँग्रेसच्या गटनेतेपदी अधिकृत नोंद करण्यात आली. या घडामोडीनंतर चंद्रपूर काँग्रेसमध्ये आता सर्व काही सुरळीत असून कोणताही वेगळा गट अस्तित्वात नसल्याचा दावा पक्षाने केला आहे. आता चंद्रपूर महानगरपालिकेत सर्व २७ नगरसेवक हे एकसंघपणे काँग्रेसच्या गटात असून येत्या १० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापौर निवडणुकीत महाविकास आघाडीचाच महापौर होणार, याबाबत पक्षाला पूर्ण विश्वास आहे.गट नोंदणीच्या वेळी बोलताना काँग्रेस गटनेते राजेश अडूर म्हणाले की, चंद्रपूर महानगरपालिकेमध्ये काँग्रेसचे २७ नगरसेवक निवडून आले आहेत. आज आम्ही सर्वांनी एकत्र येत नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात



गट नोंदणी केली आहे. हा गट महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार, तसेच राज्याचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार आणि चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आला आहे. तसेच काँग्रेसच्या या गटाला मित्र पक्षांचाही पूर्ण पाठिंबा मिळाला आहे. महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष काँग्रेससोबत ठामपणे उभे आहेत. तसेच जनविकास पक्षाचे नगरसेवकही काँग्रेसला पाठिंबा देत असल्याने चंद्रपूरमध्ये काँग्रेसचाच, म्हणजेच महाविकास आघाडीचाच महापौर होणार, अशी ग्वाही त्यांनी दिली. तर महापौर पदासाठी कोणाची निवड होईल, याचा अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठी घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## MIMच्या नगरसेविकेचं भाजपला मतदान ; स्वपक्षीय नेते पाहातच राहिले

**अमरावती :** अमरावती महापालिकेत महापौर पदाच्या निवडणुकीत लक्षवेधी घडामोडी घडल्या आहेत. अमरावती महापालिका निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला मतदारांनी कौल दिलेला नाही. त्यामुळे इथे अन्य पक्षांची मदत घेऊन सत्ता स्थापन करावी लागणार आहे. भाजप , शिंदेसेनेला मदत करणार नाही, अशी भूमिका एमआयएमच्या राज्य नेतृत्त्वानं घेतलेली असताना अमरावतीत एमआयएमच्या नगरसेविकेनं पक्षादेश झुगारला आहे. त्यांनी भाजपच्या महापौरपदाच्या उमेदवाराला मतदान केलं आहे. त्यामुळे त्यांना पक्षातून निलंबित करण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.एमआयएमच्या नगरसेविका मिराबाई कांबळे यांनी पक्षादेशाच्या




विरोधात जाऊन भाजपच्या महापौर पदाच्या उमेदवाराला मतदान केलं. त्यानंतर एमआयएमच्या गटनेत्यांनी त्यांना निलंबित केलं. 'आमच्या पक्षाची एक विचारधारा आहे. त्या विचारधारेच्या विरोधात जाणाऱ्यांवर निश्चित कारवाई होईल. महापालिकेत मी पक्षाचा गटनेता असल्यानं १२ नगरसेवकांसाठी व्हिप जारी केला होता. तरीही मिराबाई कांबळे यांनी व्हिप झुगारला आणि भाजपच्या महापौर पदाच्या उमेदवाराला मतदान केलं,' अशी माहिती एमआयएमच्या गटनेत्यांनी दिली.या सगळ्या प्रकरणावर मिराबाई कांबळे यांनीही भाष्य केलं.

भाजपचे महापौर पदाचे उमेदवार चांगलं काम करणारे वाटले, म्हणून त्यांना मतदान केल्याचं मिराबाई कांबळे म्हणाल्या. पक्षानं सूचना दिल्या होत्या. पण भाजपचे उमेदवार विकासकामं करणारे वाटले, म्हणून त्यांना मतदान केल्याचा खुलासा कांबळे यांनी केला. पक्षाकडून कारवाई झाली तरीही भरपूर मार्ग असतात, असंही कांबळे पुढे म्हणाल्या.अमरावतीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेलं नाही. महापालिकेत एकूण ८७ जागा आहेत. पैकी सर्वाधिक २५ जागा भाजपला मिळाल्या आहेत. त्याखालोखाल १५ जागा काँग्रेसनं जिंकल्या आहेत. युवा स्वाभिमान पक्षानंदेखील १५ जागांवर यश मिळवलं आहे. युवा स्वाभिमान हा भाजपचा मित्रपक्ष आहे. त्या दोघांचा एकत्रित आकडा ४० वर जातो. एमआयएमनं १२ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं ११ जागांवर विजय मिळवला. शिंदेसेनेनं ३, तर ठाकरेसेनेनं २ जागांवर बाजी मारली. अमरावती महापालिकेत बहुमताचा आकडा ४४ इतका आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भारतीयांशी लग्न करु शकत नाही, कोरियाला न्या; तीन बहिणींच्या मृत्यू प्रकरणात अपडेट

**गाझियाबाद :** येथील भारत सिटी सोसायटीमध्ये तीन मुलींच्या आत्म हत्येची वेगवेगळी कारणे समोर आली आहेत. मुलींच्या खोलीतून सापडलेल्या नऊ पानांच्या पॉकेट डायरीतून त्यांना कोरियाचे आकर्षण असल्याचे समोर आले आहे. त्याचबरोबर त्यांचे वडील आर्थिक अडचणीत सापडल्याने कौटुंबिक कलह निर्माण झाल्याचाही त्यांना त्रास होत असल्याचे पोलिसांनी गुरुवारी सांगितले. आम्हाला दक्षिण कोरियाला घेऊन चला, नाहीतर आम्ही मरण पत्करु, असंही तिघींनी मृत्यूच्या काही तास आधी सांगितल्याचं त्यांचे वडील म्हणाले.



१६, १४ आणि १२ वर्षांच्या तिघी बहिणींनी बुधवारी मध्यरात्री दोन वाजता गाझियाबाद येथील भारत सोसायटीच्या नवव्या मजल्यावरील घरातून उडी मारून आत्महत्या केल्यानंतर त्यांचे वडील चेतनकुमार यांनी, त्या जवळपास तीन वर्षांपासून कोरियन गेम खेळत होत्या आणि तेव्हापासून शाळेत गेल्या नव्हत्या, असे पोलिसांना सांगितले. या मुलींनी कोरियन टास्क-आधारित अ‍ॅपचा वापर केल्याचे पोलिसांनी सांगितले. कदाचित वैयक्तिक कारणांमुळे तसे केले असावे, असे पोलिसांनी म्हटले आहे. शवविच्छेदन अहवालात मुलींच्या डोक्याला दुखापत झाल्यामुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. बुधवारी रात्री मुलींवर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, डायरीमध्ये मुलींचे कोरियावरील प्रेम आणि कुटुंबाने त्यांना ते सोडून देण्याचे प्रयत्न केल्याचे वारंवार उल्लेख आहेत.

'आम्हाला कोरियन आवडतात. प्रेम, प्रेम, प्रेम,' असे डायरीमध्ये म्हटले आहे. त्यांचे पालक त्यांच्या आवडी आणि लग्नासाठी केलेल्या संभाव्य निवडीलाही विरोध करत होते.तुम्हाला एका भारतीयाशी आमचे लग्न अपेक्षित होते, ते कधीही होऊ शकत नाही,' असे डायरीमध्ये म्हटले आहे. त्याचबरोबर शारीरिक शिक्षेचादेखील उल्लेख आहे. 'तुमच्या मारहाणीपेक्षा आमच्यासाठी मृत्यू बरा. म्हणूनच आम्ही आत्महत्या करत आहोत, असाही उल्लेख आहे. डायरी कोणत्या परिस्थितीत लिहिली गेली आणि त्या संबंधित सर्व पैलूंचा आम्ही अभ्यास करत आहोत,' असे पोलिस उपायुक्त निमिश पाटील यांनी सांगितले.मुलींचे वडील चेतन हे शेअर बाजारात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यानंतर तणावाखाली होते. त्यांचे दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले होते. एका वेळी वीजबिल भरण्यासाठी त्यांनी मोबाइलही विकला होता. अनेक अडचणीमुळे घरी वारंवार भांडणे होत होती, असे रहिवाशांच्या संघटनेच्या एका पदाधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

## मंत्रालयात ओळखी, महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं, १७ लाखांचा गंडा

**नवी मुंबई :** घटस्फोटामुळे अस्थिर झालेले आयुष्य पुन्हा रुळावर आणण्यासाठी मुलुंडच्या एका महिलेने विवाह जुळिवणाऱ्या वेबसाइटवरून जोडीदार निवडला. पुन्हा संसार थाटणार, या आनंदात असलेल्या महिलेचा पुन्हा एकदा हिरमोड झाला. संसाराची स्वप्ने ज्या जोडीदारासोबत पाहिली जात होती, त्याने विश्वासघात केला. सरकारच्या निर्भया फंडातून घटस्फोटित महिलांना स्वस्तात घर घेऊन देतो सांगत या वाग्दत्त वराने १७ लाखांचा गंडा घातला.मुलुंडच्या पूर्वेकडे राहणारी मेघना ही ग्राफिक डिझायनर आहे. सन २०१२ मध्ये तिचा घटस्फोट झाला. तेव्हापासून ती तणावात होती. घरचेही पुन्हा लग्न करण्यासाठी तिच्या मागे लागले होते. अखेर तीन-चार वर्षांपूर्वी विवाह जुळिवणाऱ्या एका वेबसाइटवर तिने नोंदणी केली. तेव्हापासून तिचा पतीचा शोध सुरू होता.सप्टेंबर २०२३ मध्ये विराज भोसले नावाच्या तरुणाने तिला 'रिक्वेस्ट' पाठवली. त्याचे प्रोफाइल पाहून मेघनाने 'रिक्वेस्ट' स्वीकारली. अधिक माहितीसाठी मेघनाने विराजला फोन केला. त्याने वडील आयपीएस अधिकारी असून आई आणि बहीण अमेरिकेत वास्तव्यास असल्याचे सांगितले. विराजने तो स्वतः राजकीय पक्षाच्या नेत्यासोबत सामाजिक क्षेत्रात काम करत असून स्वतःची एक स्वयंसेवी संस्था चालवत असल्याचे सांगितले. मेघना त्याच्या बोलण्याने प्रभावित झाली आणि तिने त्याच्यासोबत बोलणे सुरूच ठेवले.मेघनाचा विश्वास बसल्याचे पाहून विराजने आपली मंत्रालयात ओळख असून सरकारी योजनेच्या निर्भया फंडातून तुला स्वस्तात घर मिळवून देऊ शकतो, असे सांगितले. मात्र त्यासाठी बँकेत कर्ज खाते उघडावे लागेल. त्यानुसार मेघनाने खाते उघडून त्यावर १७ लाखांचे वैयक्तिक कर्ज घेतले. विराजने ही रक्कम त्याला देण्यास सांगितले. त्याबदल्यात तो घराचे ताबापत्र देणार होता. मात्र पैसे देऊन अनेक दिवस झाले तरी घर मिळत नसल्याने आणि विराज टाळत असल्याने मेघनाला संशय आला.

## फेसबुवर ओळख, प्रेमाचा सापळा रचत लग्नाचं आमिष, लॉजमध्ये महिलेवर अत्याचार..

**अहिल्यानगर :** सोशल मीडियावरील आभासी नातेसंबंध किती घातक ठरू शकतात, याचं एक धक्कादायक उदाहरण अहिल्यानगर शहरात समोर आलं आहे. फेसबुकवरून ओळख वाढवून प्रेम व लग्नाचे खोटे आश्वासन देत एका ३३ वर्षीय विवाहित महिलेवर अत्याचार केल्याचा गंभीर आरोप असून, संबंधित तरूण अत्याचारानंतर पसार झाल्याने खळबळ उडाली आहे.कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, जालना जिल्ह्यातील राजु भाऊराव काकडे ऊर्फ सुनील पटेल या तरूणाशी पीडित महिलेचा फेसबुकच्या माध्यमातून संपर्क झाला. सुरुवातीला साध्या संवादातून सुरू झालेली ओळख पुढे मैत्रीत, आणि नंतर प्रेमसंबंधात रूपांतरित झाली. 'तुझ्याशिवाय राहू शकत नाही, तुझ्याशीच लग्न करणार', अशा भावनिक पद्धतीने तरूणाने महिलेचा विश्वास संपादन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.पीडित महिला विवाहित




असून तिला चार मुले आहेत. पती व कुटुंबासोबत राहत असतानाही सोशल मीडियावरील सततच्या संवादामुळे संबंधित तरूणावर तिचा विश्वास बसला. या विश्वासातूनच तिने घरच्यांना काहीही न सांगता त्याच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. १ फेब्रुवारी रोजी रात्री तरूणाने अहिल्यानगरला आल्याचं सांगून महिलेला भेटण्यास बोलावलं. त्यानंतर दुचाकीवरून तिला छत्रपती संभाजीनगर येथे नेण्यात आलं. तेथे एका लॉजमध्ये मुक्काम करत लग्नाचं आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित करण्यात आल्याचा आरोप महिलेनं केला आहे.घटनेनंतर सकाळी 'चहा आणतो', असं सांगून तरूण महिलेचा मोबाईल घेऊन बाहेर गेला आणि तो पुन्हा परतलाच नाही. बराच वेळ वाट पाहूनही संपर्क न झाल्यानं महिला घाबरली.

# माझ्या सार्थकला मर्चंट नेव्ही अधिकारी बेपत्ता, आईची आर्त हाक ; जहाज मॉरिशसजवळ गेलं अन..

**भुवनेश्वर :** युवा मर्चंट नेव्ही अधिकारी जहाजावर कर्तव्य बजावत असताना बेपत्ता झाल्याचा आरोप कुटुंबाकडून केला जात आहे. सार्थक महापात्रा असे मूळ ओडिशा येथील भद्रक जिल्ह्यातील केसपूरचा रहिवासी असलेल्या तरुणाचं नाव आहे. ३ फेब्रुवारी रोजी जहाज मॉरिशसजवळ असल्यापासून सार्थक बेपत्ता आहे. त्याच्या शोधासाठी महापात्रा कुटुंबाने केंद्र आणि राज्य सरकारकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. सार्थक महापात्रा एका खासजी शिपिंग कंपनीसोबत जुलै २०२५ पासून कार्यरत आहे. त्याची आई रश्मिता महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार तो प्रवास करत असलेलं जहाज चीनहून पश्चिम आफ्रिकेला गेलं होतं. त्यानंतर परतीच्या प्रवासात सिंगापूर मार्गे चीनला येत



असताना मॉरिशसजवळ सार्थकशी संपर्क तुटला.दोन फेब्रुवारीला त्याची बोट सिंगापूरजवळ असताना तो माझ्याशी, इतर कुटुंबीयांशी आणि मित्र मंडळींशी बोलला होता, असं सार्थकच्या आईने सांगितलं. तो बेपत्ता झाल्याने आम्ही उद्ध्वस्त झालो आहोत. राज्य सरकार आणि केंद्राकडे आम्ही याप्रश्नी तातडीने लक्ष घालण्याची मागणी करत आहोत. माझ्या मुलाची सुटका करुन त्याला लवकर सुखरुप घरी आणा, अशी विनंती आम्ही ओदिशा सरकारकडे ईमेलद्वारा केल्याचं सार्थकच्या आईने सांगितलंसार्थकच्या आईने पंतप्रधान नरेंद्र, ओदिशाचे मुख्यमंत्री, शिपिंगचे महासंचालक आणि परराष्ट्र मंत्रालय यांच्याकडेही 'एक्स' सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून साद घातली आहे. 'एक आई म्हणून मी पारदर्शक चौकशी, सीसीटीव्ही फुटेज पाहण्याची परवानगी, सार्थकच्या वैयक्तिक वस्तूंची माहिती आणि अधिकृत माहितीचे अपडेट्स मिळण्याची विनंती करते' असे त्यांनी लिहिलेओडिशा सरकारच्या सूत्रांनी सांगितले की, त्यांनी नवी दिल्लीतील संबंधित अधिकाऱ्यांकडे हा मुद्दा मांडला असून या घटनेची चौकशी करण्याची विनंती केली आहे.दुसरीकडे, मुंबईतील दहिसर येथे राहणारा आकाश चंद्र पुजारी (२०) गुरुवारी पहाटे दुचाकीवरून त्र्यंबकेश्वरला दर्शनासाठी जात होता. पहाटे चार वाजता तो घरातून बाहेर पडला. मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगाव पुलाजवळ पावणेसहा वाजता आल्यानंतर त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. अपघात घडल्याने जवळून जाणाऱ्या कंटेनरच्या पाठीमागील चाकाखाली सापडून आकाश याचा मृत्यू झाला.

अपघातानंतर कंटेनर त्याच ठिकाणी सोडून चालक घटनास्थळावरून पळून गेला. आकाश याचा मृतदेह कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवण्यात आला. या अपघातामुळे महामार्गावर कोंडी झाली होती.

# भारताच्या युवा बिग्रेडने वर्ल्ड कप जिंकला; वैभव एकटा इंग्लंडला पुरुन उरला; ऐतिहासिक कामगिरी

**झिम्बाब्वे/वृत्तसंस्था :** अंडर १९ विश्वचषकाच्या फायनल सामन्याचा थरार झिम्बाब्वे येथे रंगला. भारत आणि इंग्लंड १९ वर्षाखालील संघात फायनल सामना रंगला. या फायनल सामन्याचे नाणेफेक भारताने जिंकले. कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून प्रथम बॅटिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करत भारताने ४११ धावा केल्या. लक्ष्यप्राप्ती करताना इंग्लंडला फक्त ३११ धावा करता आल्या. भारताने तब्बल १०० धावांनी विश्वचषक जिंकला.

भारताने 2026 U19 World Cup जिंकला आहे. टीम इंडियाने अंतिम सामन्यात इंग्लंडचा १०० धावांनी पराभव केला. भारताने १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकण्याची ही सहावी वेळ आहे. वैभव सूर्यवंशीच्या १७५ धावा



आणि गोलंदाजांच्या दमदार कामगिरीमुळे भारताला ऐतिहासिक विजय मिळाला. इंग्लंडला २८ वर्षांचा जेतेपदाचा दुष्काळ संपवण्याची संधी होती, परंतु त्यांना भारतीय संघाचे आव्हान पार करण्यात अपयश आले. अंडर १९ विश्वचषकाच्या इतिहासात कोणत्याच संघाला ३५० पेक्षा जास्त धावा काढता आल्या नाही. भारत हा पहिला संघ बनला त्यामुळे फायनल सामन्यात भारताने ऐतिहासिक कामगिरी केली.झिम्बाब्वेची राजधानी हरारे येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ४११ धावा केल्या. १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात कोणत्याही संघाने केलेली ही सर्वोच्च धावसंख्या होती. वैभव सूर्यवंशीने ८० चेंडूत १५ चौकार आणि १५ षटकार मारत १७५ धावा केल्या. भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने अर्धशतक ठोकले. त्याने ५१ चेंडूत ५३ धावा केल्या. भारताकडून सर्वाधिक विकेट या अंबरीश सुकुमारने काढल्या. त्याने तीन विकेट काढल्या. प्रत्युत्तरात इंग्लंडला फक्त ३११ धावा करता आल्या.

### भारत सहाव्यांदा विजेता ठरला

- भारतीय संघाने सर्वाधिक वेळा १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकण्याचा स्वतःचा विक्रम सुधारला आहे. भारत आता सहाव्यांदा विजेता बनला आहे, या यादीत ऑस्ट्रेलियानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने चार वेळा १९ वर्षांखालील विश्वचषक ट्रॉफी जिंकली आहे.

इंग्लंडने १७७ धावांवर सात विकेट गमावल्या होत्या, परंतु कॅलेब फॉकनरने एका लढाऊ शतकासह इंग्लंडला विजयाच्या जवळ आणण्यासाठी धाडसी प्रयत्न केले. त्याने ६७ चेंडूत ११५ धावांची शानदार खेळी केली, पण इंग्लंडचा जेतेपदाचा दुष्काळ संपवू शकला नाही.

## एक फोन अन वैभवने केल्या १७५ धावा

**झिम्बाब्वे/वृत्तसंस्था :** भारत आणि इंग्लंड यांच्यात अंडर १९ विश्वचषकाचा फायनल सामना रंगला. भारताने नाणेफेक जिंकले आणि कर्णधार आयुष म्हात्रेने प्रथम बॅटिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करत भारताने ४११ धावा केल्या. १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात Vaibhav Sooryavanshi ८० चेंडूत १७५ धावा केल्या. विशेष म्हणजे, वैभवने स्पर्धेतील पहिले शतक अंतिम सामन्यात झळकावले. त्याने लीग सामने आणि उपांत्य फेरीत चांगल्या खेळी केल्या. एका फोनने वैभवचा खेळ बदलला आणि त्याने फायनल सामन्यात पराक्रम केला.वैभवचे प्रशिक्षक मनीष ओझा म्हणाले की, 'अंतिम सामन्यापूर्वी त्यांनी सूर्यवंशीला फोन केला होता. त्याला एक समस्या आहे, ज्यामुळे तो शॉर्ट बॉलमध्ये बाद होत आहे. पुल शॉट खेळताना त्याच्या डोक्याच्या स्थितीत समस्या आहे आणि त्यामुळे तो वारंवार मागे जात आहे. जर तु चेंडूच्या बरोबरीने पुढे आला तर तुम्ही योग्य शॉट माराल. जर तुमच्याकडे वेळ असेल तर सराव करा. जर तुम्हाला शॉर्ट बॉल मिळाला तर तो सोडू नकोस त्याऐवजी, रांगेत येऊन त्याला मार.'वैभव सूर्यवंशीची मेहनत फळाला आली. इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजांनी या खेळाडूविरुद्ध सातत्याने शॉर्ट बॉलचा वापर केला, परंतु यावेळी वैभवने प्रयत्न केले. त्याने शॉर्ट बॉलवर त्याचा पहिला षटकार मारला आणि त्यानंतर तो थांबला नाही. सूर्यवंशीने सामन्यात १५ षटकार आणि १५ चौकार मारले. त्याने केवळ षटकार आणि चौकारांच्या मदतीने १५० धावा केल्या. सूर्यवंशीने १९ वर्षांखालील विश्वचषक फायनलमध्ये सर्वात जलद शतक ठोकले. त्याने अंतिम सामन्यात




सर्वाधिक धावाही केल्या. सूर्यवंशीने सर्वाधिक षटकार मारले. सूर्यवंशीला त्याच्या प्रशिक्षकाचे ऐकण्याचा खूप फायदा झाला.

भारताने सहाव्यांदा अंडर १९ विश्वचषक जिंकला. भारताने फायनल सामन्यात ४११ धावा करुन इतिहास रचला. भारत हा पहिला संघ बनला ज्याने विश्वचषकाच्या इतिहासात ३५० पेक्षा सर्वाधिक धावा केल्या.

## चॅम्पियन बनल्यानंतरही आयसीसीकडून मिळणार नाही बक्षिस रक्कम

**झिम्बाब्वे :** हरारे स्पोर्ट्स क्लब येथे झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने इंग्लंडविरुद्ध विजय मिळवत सहाव्यांदा विजेतेपद पटकावले. ही भारताची सर्वात मोठी कामगिरी आहे, कारण हा संघ सर्वाधिक वेळा विश्वचषक जिंकला आहे आणि यावेळीही त्याने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने चमकदार कामगिरी केली.

संपूर्ण स्पर्धेत ते अपराजित राहिले आणि विजयी झाले. पण खउउ मात्र चॅम्पियन्स खेळाडूंना बक्षिस रक्कम देणार नाही असं का ते जाणून घ्या...अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने ५० षटकांत ९ गडी गमावून ४११ धावांचा मोठा धावसंख्या उभारला, ज्यामध्ये तरळलहर्रीं डेीूर्रीरपीहळ ८० चेंडूत १७५ धावांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, इंग्लंडने पाठलाग करताना संघर्ष केला आणि सामना भारताच्या बाजूने संपला. कर्णधार आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली, तरुण खेळाडूंनी संघाला बळकटी दिली आणि प्रत्येक आव्हानाचा धैर्याने सामना केला. भारतीय संघाने विश्वचषकाच्या इतिहासात प्रथमच ३५० पेक्षा अधिक धावा केल्या. भारतीय संघाने ४११ धावा केल्या आणि ऐतिहासिक कामगिरी केली.ऐतिहासिक विजयानंतरही, टीम इंडियाला आयसीसी कडून कोणतीही अधिकृत बक्षीस रक्कम मिळणार नाही. १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेट विश्वचषकात आयसीसी कोणतेही रोख बक्षीस देत नाही.

ही स्पर्धा तरुण क्रिकेटपटूंच्या कौशल्यांचा विकास, अनुभव आणि त्यांना बळकटी देण्यासाठी डिझाइन केलेली एक विकासात्मक स्पर्धा आहे. मागील आवृत्तीतही आयसीसीने कोणतीही बक्षीस रक्कम दिली नव्हती.तरीही, भारतीय संघातील खेळाडूंना निराश होण्याची गरज नाही. अशा मोठ्या कामगिरीसाठी बीसीसीआय अनेकदा आपल्या खेळाडूंना उत्तम बक्षीस देते. उदाहरणार्थ, २०२४ च्या १९ वर्षांखालील विश्वचषकात भारताच्या विजयासाठी बीसीसीआयने प्रत्येक खेळाडूला ३० लाख रुपये दिले.

# T-20 World Cup च्या संघात मिळालं स्थान, बीसीसीआयने बदलली टीम, हर्षित राणाची मोहम्मद सिराज ?

**मुंबई/वृत्तसंस्था :** भारत उद्यापासून टी-२० विश्वचषकाच्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. उद्या पहिला सामना भारत अमेरिकाविरुद्ध खेळणार आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जाईल. आता टी-२० विश्वचषकापूर्वी भारतीय संघात मोठा बदल झाला आहे. संघात ऐनवेळी बीसीसीआयने एक बदलीची घोषणा केली आहे. एक दिवसापूर्वी संघात बीसीसीआयने अचानक बदल करण्याचे काय ते जाणून घ्या...2026 T 20 World Cup दिवस आधी भारतीय संघात मोठा बदल करण्यात आला आहे. बीसीसीआयने जखमी जलदगती गोलंदाज Harshit Rana जागी खेळाडूची घोषणा केली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सराव सामन्यादरम्यान राणा जखमी झाला होता. त्याच्या जागी जलदगती गोलंदाज मोहम्मद सिराजला संघात स्थान देण्यात आले आहे.बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार, ४ फेब्रुवारी २०२६ रोजी नवी मुंबईत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सराव सामन्यादरम्यान गुडघ्याला झालेल्या दुखापतीमुळे टीम इंडियाचा जलदगती गोलंदाज हर्षित राणा आगामी आयसीसी






पुरुष टी२० विश्वचषक २०२६ मधून बाहेर पडला आहे. तज्ञांचा सल्ला आणि स्कॅन केल्यानंतर, बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याला स्पर्धेत खेळण्यास अयोग्य घोषित केले आहे. संघ व्यवस्थापन त्याला लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा देतो. Mohmmed Siraj हर्षित राणाची जागा घेईल.मोहम्मद सिराजने त्याच्या कारकिर्दीत आतापर्यंत १६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. १६ डावांमध्ये त्याने ३२.२८ च्या सरासरीने आणि ७.७९ च्या इकॉनॉमीने १४ विकेट्स घेतल्या आहेत. या फॉरमॅटमध्ये त्याची सर्वोत्तम कामगिरी ४/१७ आहे. त्याने शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना ३० जुलै २०२४ रोजी श्रीलंकेविरुद्ध खेळला होता. जवळ जवळ दीड वर्षानंतर सिराजचा टी-२० संघात कमबॅक झाला असून आता त्याला थेट विश्वचषकाचा सामना खेळण्याची संधी मिळाली आहे. सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल (उपकर्णधार), रिंकू सिंग, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, वॉशिंग्टन सुंदर, मोहम्मद सिराज.

# डेटिंगच्या काळात आम्ही कधीही...' रितेश-जिनिलियानं पहिल्यांदा शेअर केली खास गोष्ट





**मुंबई :** रितेश देशमुख आणि जिनिलिया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा-वहिनी म्हणून ओळखले जातात. जिनिलिया आणि रितेश सोशल मीडियावर कायम सक्रीय असतात आणि विनोदी रील्स शेअर करतात. रितेश आणि जिनिलियाची जोडी सर्वांनाच आवडते. त्यांच्या रील्सवर चाहते भरभरून प्रतिसाद देतात. रितेश आणि जिनिलियाच्या लग्नाला आता १४ वर्षे पूर्ण झाली आहेत. लग्नापूर्वी रितेश आणि जिनिलिया १० वर्षे एकमेकांना डेट करत होते. त्यामुळे लग्नाची १४ आणि डेटिंगची १० अशी २४ वर्षे ते एकमेकांच्या सोबत आहेत. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये जिनिलिया आणि रितेशनं त्यांच्या डेटिंगच्या काळाबद्दल भाष्य केलं आहे.रितेश आणि जिनिलियानं नुकतीच सानिया मिर्झाच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावलेली. यादरम्यान त्यांनी डेटिंगच्या काळात ते एकत्र राहत नसल्याचा खुलासा केला. आजच्या काळात 'लिव्ह-इन रिलेशनशिप' ही गोष्ट सर्रास झाली आहे. अनेक कलाकार लग्नापूर्वी लिव्ह-इनमध्ये राहत होते. मात्र, जिनिलिया आणि रितेश यांनी असं केलं नाही. मुलाखतीदरम्यान रितेश म्हणाला की, 'आम्ही लग्नाआधी १० वर्ष एकमेकांना डेट करत होतो, पण त्या संपूर्ण काळात आम्ही कधीही एकत्र राहिलो नव्हतो.'रितेश पुढे म्हणाला, 'आम्ही अनेकदा सुट्ट्या घालवण्यासाठी बाहेर गेलो किंवा चित्रपटाच्या शूटिंगसाठी परदेशात एकत्र असायचो.

कधी मित्रांसोबत ट्रिपला गेलो तरीही आमच्या रूम्स कायम वेगळ्या असायच्या. आम्ही कधीही हॉटेलमध्ये एकत्र रूम शेअर केली नाही. जेव्हा आमचं लग्न झालं, तेव्हा पहिल्यांदा आम्ही एकत्र राहिलो आणि तेव्हा खऱ्या अर्थाने एक नवीन जीवन सुरू झालं.'दरम्यान, रितेश आणि जिनिलिया यांची भेट २००२ मध्ये 'तुझे मेरी कसम' या सिनेमाच्या सेटवर झालेली. पहिल्यांदा जिनिलियानं रितेशकडे दुर्लक्ष केलं. रितेशला जिनिलिया खूपच विचित्र वाटली, तर अभिनेत्रीला रितेश अहंकारी वाटला.मात्र, सिनेमाच्या शुटिंगदरम्यान त्यांच्यात मैत्री झाली. २००४ मध्ये त्यांनी 'मस्ती' या चित्रपटात एकत्र काम केलं आणि त्यांच्या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. रितेश देशमुख आणि जिनिलियानं एकदा नाही तर दोनदा लग्न केलं. त्यांचं पहिलं लग्न ३ फेब्रुवारी २०१२ रोजी महाराष्ट्रीयन पद्धतीनं झालं आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी चर्चमध्ये लग्न झालं.

## मुलगी बापासाठी काय असते, हा विचार त्यांच्या मनात आला नसेल?' गौतमीची वडिलांबद्दल खंत



**मुंबई :** गौतमी पाटील ला कोणत्याही परिचयाची गरज नाही. 'सबसे कातिल गौतमी पाटील' म्हणून प्रसिद्ध आहे. गौतमीचा मोठा चाहतावर्ग आहे. गौतमीच्या कार्यक्रमादरम्यान चाहते मोठ्या प्रमाणावर गर्दी करतात. मात्र, गौतमीचा हा प्रवास सोपा नव्हता. गौतमीनं वैयक्तिक आयुष्यात अनेक अडचणी सहन केल्या आहेत. गौतमीच्या जन्माआधीच तिचे आई-वडील विभक्त झालेले. त्यामुळे गौतमीच्या आईनंच तिचं संगोपन केलं. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये गौतमीनं तिच्या वडिलांबद्दल भाष्य केलं आहे. गौतमीचे वडील धुळ्यामध्ये सापडले होते. गौतमीच्या वडिलांची परिस्थिती खूप खालावलेली. त्यानंतर तिनं वडिलांवर उपचार केले. नुकत्याच 'अभिजात मराठी'च्या 'आम्ही असं ऐकलंय' या मुलाखतीदरम्यान गौतमी म्हणाली की, 'माझ्या आजोबांकडून मला बाबांचं प्रेम मिळालं. मी लहानपणापासूनच आजोबांकडे राहिले. माझ्या आईने आणि आजोबांनीच मला सांभाळलं. शाळा असो किंवा इतर काही गोष्टी सगळं आजोबांनीच पाहिलं. म्हणजे जिथे वडील पाहिजे होते. तिथे आजोबा होते.'शाळेतील आठवण सांगताना गौतमी म्हणाली की, 'शाळेत असताना माझ्या मैत्रीणी आणि त्यांच्या वडिलांना पाहून प्रत्येकवेळी बाबांची आठवण यायची. मग मी आईला विचारायचे...पप्पा कुठे आहेत. पण आई त्यावर उत्तर देणं टाळायची. तेव्हा तिलाही त्रास झाला असेल. तेव्हा मी लहान होते, मला काहीच कळायचं नाही. पण, आता मी त्यावर बोलायचं टाळते. आईने प्रत्येकवेळी माझा विचार केला.'मनातील खंत व्यक्त करत गौतमी म्हणाली की, 'वडील मला कधी भेटायला आलेच नाहीत. आपली मुलगी आहे तर तिला भेटावं? तिच्याकडे जायचं का? असा कधी त्यांना विचार आला नसेल का? असं मला वाटतं. मुलगी बापासाठी काय असते? असा विचार नाही आला का त्यांच्या मनात? तेवढी एक खंत मनात आहे. पण, ज्यावेळी त्याचं निधन झालं तो क्षण माझ्यासाठी खूप अवघड होता. मी त्यांना शेवटच्या क्षणी भेटले. आम्ही त्याआधी सुद्धा भेटलो होतो. त्यांना आणि माझ्या आईला एकत्र आणायचं, असा आम्ही विचार केला होता. आम्ही पुण्यात होतो, तेव्हा ते राहायचे आमच्यासोबत. पण, ते दारू प्यायचे आणि सगळं... शेवटच्या क्षणी तरी ते मला भेटले याचा आनंद मला आहे.'

## चुकीचा स्पर्श; मराठी अभिनेत्रीनं सांगितला प्रसंग, म्हणाली, 'माझ्या पाठीवरून'



**मुंबई :** इंडस्ट्रीमध्ये अनेक कलाकारांना वाईट अनुभव येतात. काही अभिनेत्रींनी कास्टिंग काऊचचा सामना केला आहे. त्याबद्दल अनेक अभिनेत्रींनी मुलाखतीदरम्यान सांगितलंही आहे. अशातच आता मराठी अभिनेत्री शर्मिष्ठा राऊतनं मराठी इंडस्ट्रीतील वाईट अनुभव शेअर केला आहेशर्मिष्ठा राऊतने नुकतीच 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान शर्मिष्ठा म्हणाली की, 'मी ही घटना आधी सांगितली आहे की, नाही ते मला आठवत नाहीये. माझ्यासाठी सध्या हे नॅशनल टेलिव्हिजनच झालेलं आहे त्यामुळे मी हे बोलतेय. मी एक शो करायचे. इंडस्ट्रीत पदार्पण केल्या केल्या शो केला. मी त्या कार्यक्रमाचं आणि निर्मात्यांचं नाव घेणार नाही कारण ते खूप चांगले आहेत. तिकडे एक अभिनेते होते ते ज्या पद्धतीने मी सेटवर आल्यावर मला ग्रीट करायचे ते मला समजत होतं की चुकीचं आहे. त्यावेळी मी खूप प्रसिद्ध अभिनेत्रीही नव्हते. माझी अगदीच सुरुवात होती. ते ज्या पद्धतीने मला ग्रीट करायचे, मला समोरून मिठी मारायचे. तेव्हा मला त्यांचा स्पर्श कळायचा. मला कळायचं की, हा स्पर्श चुकीचा आहे. पाठीवरून एक विचित्र हात फिरवायचे.'शर्मिष्ठा पुढे म्हणाली की, 'माझं असं झालेलं की आताच आलोय आणि काहीच माहित नाहीये. हे घरीही जाऊन सांगता येणार नाही. त्यांनाही टेन्शन येईल. मी कसं बोलू मला कळत नव्हता. हे दोन-तीनदा झालं त्या सेटवर तसंच. मग मी एक दिवशी ठरवलं की, मी बोलणार. जास्तीत जास्त काय होईल मी इंडस्ट्रीतून बाहेर होईन. आउट झालो तरी, माझ्याकडे डिग्री आहे. मी पंधरा ते वीस हजाराची नोकरी कमावू शकते. मला माझ्या आई-वडिलांनी हेच शिकवलं आहे. त्यानंतर पुन्हा एकदा ते सेटवर मला मिठी मारायला आले 'अरे हाय म्हणून. तेव्हा मी त्यांना म्हटलं 'सर मी घातलीय तर त्यांना कळलं नाही.

## धनुषबद्दल असं काय बोलून गेली मृणाल ठाकूर? चाहत्यांचा वाढला गोंधळ





**मुंबई :** अभिनेत्री मृणाल ठाकूर आणि अभिनेता धनुष हे दोघं दोघं नात्यात असल्याची चर्चा गेले अनेक दिवस सुरू आहे. या सगळ्यांत या दोघांनीही अधिकृतपणे काहीही भाष्य केलेलं नाही. ते लवकरच लग्न करणार असल्याच्या चर्चा सुरू असल्या, तरी त्यावर हाताची घडी आणि तोंडावर बोट, हे धोरण धनुषनं स्वीकारलं आहे. मृणालनं मात्र एक वेगळंच भाष्य करून ही चर्चा सुरू कशी राहील, याची काळजी घेतल्याचं दिसतं. तिनं तर धनुषला थेट भाऊ असल्याचं म्हटल्यानं चाहत्यांचा गोंधळ मात्र वाढताना दिसतोय. तर मृणाल सध्या तिच्या अभिनयापेक्षा वैयक्तिक आयुष्यामुळं अधिक चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांपासून मृणाल आणि साऊथ सुपरस्टार धनुष यांच्या अफेअरच्या चर्चांनी सोशल मीडियावर जोर धरला होता. इतकंच नाही तर, हे दोघे व्हॅलेंटाईन डेला म्हणजेच १४ फेब्रुवारी रोजी लग्न करणार असल्याच्या बातम्याही वाऱ्यासारख्या पसरल्या होत्या. मात्र, आता या सर्व अफवांवर मौन सोडलं असलं तरी चर्चा मात्र थांबल्या नाही येत. एका कार्यक्रमात बोलताना मृणालनं या अफेरच्या चर्चांवर भाष्य केलं. ' खरं तर मी नेहमीच माझं काम हिच माझी ओळख कशी बनेल यावर विश्वास ठेवलाय, अशा चर्चा, गॉसिपवर तर अजिबातच नाही.

धनुष हा माझ्यासाठी नेहमीच भावासारखा राहिला आहे. आमचं नातं केवळ व्यावसायिक आणि आदराचं आहे, त्या पलीकडं काहीही नाही.' असं तिनं म्हटलंय.मृणालनं धनुषला भाऊ म्हटल्यानं पुन्हा एकदा तिच्या वैयक्तिक आयुष्यात नेमकं चाललं तरी काय आहे, असा प्रश्न चाहत्यांना पडलाय.एका कार्यक्रमात मृणालनं 'प्रेम ही अतिशय सुंदर भावना आहे आणि या पृथ्वीतलावर ती सगळ्यांच्या वाट्याला यायला हवी. ही जगातली सगळ्यांत सुंदर गोष्ट असून, ती तुम्हाला सकारात्मक बनवते. लहानपणापासून तुमच्यात कोणतेही स्वभावदोष असोत, प्रेमात पडल्यावर तुम्ही पूर्णपणे बदलून जाता आणि तुमच्यातल्या दोषांचा सामना करू शकता. प्रेमात पडल्यावर तुमच्यात देण्याची भावना निर्माण होते आणि तुमचं एका चांगल्या व्यक्तीत रूपांतर होतं.' मृणालनं प्रेमावर दिलेले हे धडे ऐकून ती नक्कीच प्रेमात पडली आहे, हे सगळ्यांना कळलं आहे. मात्र, तो धनुष आहे की नाही, याचं उत्तर मिळण्यासाठी आणखी काही काळ वाट पाहावी लागेल, असं दिसतंय.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# २५ फेब्रुवारीला शेगाव येथे राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा..

## राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते होणार आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन केंद्रिय आयुषमंत्री प्रताराव जाधव यांनी दिली पत्रकार परिषदेत माहिती

**जनसंचलन/बुलढाणा**

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने येत्या २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान शेगांव येथे राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या आरोगय मेळाव्याचे उद्घाटन भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते होणार आहे .अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज शेगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली. केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की आयुष विभागाच्या वतीने हा आरोग्य मेळावा संत गजानन महाराजांच्या नगरीमध्ये होणार आहे. या मेळाव्याचे उद्घाटन कार्यक्रमाला महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल आचार्य देवव्रत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंदआबा पाटील, सह पालकमंत्री संजय सावकारे, राज्याचे कामगारमंत्री आकाश फुंडकर, आ.डॉ.संजय कुटे, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन ट्रस्टचे अध्यक्ष पद्मश्री पद्मविभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा तसेच आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्य प्रोफेसर राकेश शर्मा यांना देखील निमंत्रित करण्यात आले आहे. आयुष मंत्रालयाच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित करण्याची जबाबदारी अखिल भारतीय आयुर्वे द महासंम्मेलनाला देण्यात आली आहे. अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन ही महाराष्ट्र त्र्यंबकेश्वर येथे १९०७ साली स्थापन झालेली आयुर्वेदाची सर्वात मोठी व जुनी संघटना आहे जी संपूर्ण देशभर कार्यरत आहे. सदर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आयोजन समिती स्थापन करण्यात आली असून आयुर्वेद महासंमेलनाचे उपाध्यक्ष डॉ.आशुतोष गुप्ता यांना आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आलेली आहे. आयुर्वेद महासंम्मेलनाने यापूर्वी २२ राज्यस्तरीय आरोग्य तसेच ३ राष्ट्रीय स्तरावरील आरोग्य मेळावे त्यांनी यशस्वीपणे आयोजित केले आहेत. या राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये आयुष चिकित्सा पद्धतींचा म्हणजेच आयुर्वेद, युनानी, सिद्धा, सोवा-रिग्पा, होमिओपॅथी, निसर्गोपचार व योगाचा प्रचार प्रसार व्हावा या दृष्टीकोनातुन केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळाव्यात चारही दिवस नागरिकांची व रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन त्यांना औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन देखील विविध तज्ञ व्याख्यानांच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. या मेळाव्याचा फायदा बुलढाणा जिल्हा व परिसरातील शेतकऱ्यांना देखील होणार असून या मेळाव्यात वन औषधी लागवड, संदर्भात मार्गदर्शन देखील करण्यात येणार आहे. त्याचा उपयोग शेतकऱ्यांना आपल्या शेतात वन औषधी लागवडीसाठी होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे. या आरोग्य मेळाव्यात देशभरातील अनेक आयुष औषध निर्माता कंपनी सहभागी होणार असून त्यांच्या माध्यमातून गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेसचा अवलंब ते कशा पद्धतीने करीत आहेत, सोबतच आयुर्वेदामध्ये चाललेले नवीन नवीन संशोधन याबद्दलची माहिती देखील दिली जाणार आहे. आयुष औषधी निर्माता वर्गासाठी देखील वेगवेगळ्या कार्यशाळांचे आयोजन या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या ठिकाणी वनऔषधी प्रदर्शनाच्या माध्यमातून सामान्य लोकांना आपल्या जवळपास सापडणाऱ्या वन औषधीच्या साहाय्याने सोपा आणि माफक दरात उपचार कशा पद्धतीने केले जाऊ शकतता याची देखील माहिती या ठिकाणी मेळाव्यात दिली जाणार आहे. आपण आयुष मंत्री म्हणुन कार्यभार स्वीकारल्यानंतर अभिनव पद्धतीने आयुष मंत्रालयाचे कामकाज पुढे नेण्याचा सातत्याने काम करत आहोत. यातील प्रमुख बाबी म्हणजे, देश का प्रकृति परीक्षण अभियान, २९ ऑक्टोबर २०२४ रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अभियानाची घोषणा केली. या अभियानात १.३९ कोटी लोकांनी सहभाग घेतला आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये ५ गिनीज विश्वविक्रम नोंदवले गेले. त्याचप्रमाणे जागतिक आरोग्य संघटनेसोबत () मिळून पारंपारिक औषधोपचारांवरील दुसरी जागतिक शिखर परिषद डिसेंबर २०२५ मध्ये दिल्लीत संपन्न झाली. यामध्ये १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते, २५ हून अधिक देशांचे मंत्रीस्तरीय शिष्टमंडळ आले होते आणि १८ देशांसोबत द्विपक्षीय बैठका ( ) पार पडल्या. जून २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय



योग दिनानिमित्त ५ गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवले गेले. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे ३ लाखांहून अधिक लोकांनी एकत्र योगाभ्यास केला. ऑक्टोबर २०२४ मध्ये, आदरणीय राष्ट्रपतींच्या हस्ते , दिल्ली येथे आयुष औषधी केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. आता आयुष मंत्रालयाच्या सर्व संस्थांमध्ये आम्ही आयुष औषधी केंद्रे सुरू करणार आहोत ही आयुष औषधी सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्याची आमची योजना आहे. सध्या आयुष्मान भारत योजनेत आयुष पॅकेजेसचा समावेश करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. आपल्या मंत्रीपदाचा फायदा सर्वसामान्य जनतेलाही व्हावा. या दृष्टीकोनातुन आयुष आरोग्य मेळावा आपल्या जिल्हयात अखिल भारतील आयुर्वेद महासंम्मेलनाच्या माध्यमातुन घेत आहोत. या मेळाव्याचा लाभ नागरीकांनी घ्यावा असे आवाहन केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला कामगारमंत्री आकाश फुंडकर बुलडाणा जिल्हाधिकारी डॉ किरण पाटीलआयुर्वेद महासंमेलनाचे उपाध्यक्ष डॉ.आशुतोष गुप्ता कार्यकारी अधिकारी अवधेश कुमार श्रीवास्तव उपस्थित होते

---

# जिल्हा परिषद क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण जल्लोषात मोताळा

## पंचायत समितीकडे सर्वसाधारण विजेतपद तर चिखली उपविजेता

**जनसंचलन/बुलडाणा**

स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्या खेळाडू व कलावंतांचा बक्षीस वितरण समारंभ जल्लोषात पार पडला. सांघिक व वैयक्तिक विविध क्रीडा प्रकारात मिळविलेल्या उल्लेखनीय यशाच्या पार्श्वभूमीवर मोताळा पंचायत समितीने सर्वसाधारण विजेतपद पटकावले. तर चिखली पंचायत समिती या स्पर्धांमध्ये उपविजेता ठरले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते हा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सुविद्य पत्नी रिपिका खरात,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन समितीचे सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी



अनिल अकाळ,रणजीत सिंह राजपूत, अन्य खातेप्रमुख व गटविकास अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. या बक्षीस वितरण समारंभात विविध क्रीडा प्रकारात तसेच सांस्कृतिक प्रकारामध्ये वैयक्तिक व सांघिक अशा दोन्ही गटात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंचा तसेच संघांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे या औचित्यावर बुलढाणा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोमलवाडी येथील सिद्धी विठ्ठल सोनोने या वीर बालिकेचा कळसुबाई शिखर तसेच उत्तराखंड मधील केदारकंठा ही अवघड शिखरे अतिशय लहान वयात सर केल्या बद्दल प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार यांनी केले तर सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे व किरण वाघमारे यांनी पार पाडले. समारोपाच्या अखेरीस माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल आकाळ यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

---

## एरव्ही जिल्हा परिषदेच्या कागद आणि फाईलीच्या प्रचंड व्यापात सतत व्यस्त असणारी बोटं

# सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने तबल्यावर थिरकली



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी गुरुवारी रात्री सांस्कृतिक महोत्सवात तबला वादन केले. बँजोच्या साथीने त्यांनी त्रिताल व केरवातील सुंदर बोलांनी नटरंगमधील धुनवर जुगलबंदी रंगवली. त्यांच्या या वादन कौशल्याला उपस्थित रसिकांनी भरभरून दाद दिली. जुगलबंदीत तन्मयतेने तबला वादनात रममाण झालेल्या गुलाब खरात यांच्या विविध भावमुद्रा मुक्त छायाचित्रकार रविकिरण टाकळकर यांनी आपल्या कॅमेऱ्यात क्षणबध्द केले.

# मुलगी बेपत्ता झाल्याने वडिलांचा आत्महत्येचा प्रयत्न

**जनसंचलन/धाड**

: कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थिनीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणानंतर समाजात बदनामी होईल, या भीतीने मानसिक तणावात सापडलेल्या विद्यार्थिनीच्या वडिलांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना ५ फेब्रुवारी घडली. रोजी धाडनजीकच्या एका गावातील ही विद्यार्थिनी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी घरातून बाहेर पडली होती; मात्र सायंकाळपर्यंत ती घरी न परतल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध सुरू केला. सर्वत्र शोध घेऊनही ती सापडली नाही. अखेर कुटुंबीयांनी धाड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी रुईखेड मायंबा येथील २२ वर्षीय तरुणाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. २ दिवसापूर्वी मुलगी झाली होती बेपत्ता दरम्यान, मुलगी बेपत्ता झाल्याने मानसिक तणावात सापडलेल्या तसेच समाजातील बदनामीच्या भीतीने विद्यार्थिनीच्या वडिलांनी विषारी औषध प्राशन केले. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी त्यांना तातडीने धाड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून, प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास वेगाने सुरू ठेवला असून, संबंधित आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत असल्याचे सांगण्यात आले आहे. धाड पोलिसांनी हे प्रकरण गंभीरतेने घेतले आहे. तसेच, गेल्या एक आठवड्यात जिल्ह्यात पाच महिला व युवती बेपत्ता झाल्याची माहिती समोर येत आहे.

# सहकार विद्या मंदिर डोणगावच्या स्काऊटची राज्य पुरस्कारासाठी निवड...

**जनसंचलन/ डोणगाव**




बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी बुलढाणा द्वारा संचालित, इंदिराबाई माधव सावजी सहकार विद्यामंदिर डोणगाव च्या पाच स्काऊटची राज्य पुरस्कारासाठी निवड झाली. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड, राज्यस्तरीय राज्य पुरस्कार, स्काऊट चाचणी शिबिर दिनांक ६.जानेवारी ते ९ जानेवारी २०२६ दरम्यान.राज्य प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सहकार शाळेचे पाच विद्यार्थी पात्रता चाचणीत यशस्वी झाले. यामध्ये गौरव विजय किरवे, धीरज सुदर्शन साबळे, कृष्णा संदीप बाजड, नैतिक सचिन खवाल, आर्यन जयसिंग राठोड या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शाळेचे मुख्याध्यापक सुनिल गाढे सर, स्काऊट विभाग प्रमुख स्काऊटर निलेश राठोड, विलास धुमाळ, संदिप पंडीतकर यांच्या मार्गदर्शनात या विद्यार्थ्यांनी राज्य पुरस्कारासाठी तयारी केली होती. या त्यांच्या यशासाठी. बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी चे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमल झंवर, बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर तसेच, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांनी अभिनंदन केले आहे.

# क्षुल्लक कारणासाठी पत्नीचा पतीवर चाकूहल्ला



**जनसंचलन/मोताळा**

दूध आणण्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून संतप्त पत्नीने पतीवर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (ता.५) मोताळा येथे घडली. या हल्ल्यात पती गंभीर जखमी झाला असून, बोराखेडी पोलिसांनी आरोपी पत्नीविरुद्ध शनिवारी (ता.७) गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मंगेश आनंदा गवळी (वय ३०, रा. बोरखेड, ह.मु, मोताळा) यांनी बोराखेडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. गवळी हे फोटोग्राफीचा व्यवसाय करतात व पत्नीसमवेत मोताळा येथील सर्वे श्वरनगर परिसरात वास्तव्यास आहेत. तक्रारीनुसार, गुरुवारी सायंकाळी ०८:३० ते ०९:०० वाजेच्या सुमारास दूध आणण्यावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. प्रिया मंगेश गवळी (वय २१) हिने घरात असलेला चाकू उचलून पतीच्या मांडीत वार केला. या हल्ल्यात मंगेश गवळी गंभीर जखमी झाले. यावेळी पत्नीने शिवीगाळ करीत जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. जखमी पतीवर उपचार सुरू असून, वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे बोराखेडी पोलिसांनी आरोपी पत्नीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# गण गण गणात बोतेच्या जयघोषाने बुलढाणा नगरी दुमदुमली...

## भावपूर्ण वातावरणात गजानन महाराज प्रगट दिन साजरा...





**जनसंचलन/बुलढाणा**

गण गण गणात बोते चा मंत्र, टाळ-मृदंगाचा गजर आणि शेगावच्या राजाप्रती असलेली अलोट श्रद्धा अशा चैतन्यमयी वातावरणात आज बुलडाणा शहरात विविध ठिकाणी संत शिरोमणी श्री गजानन महाराज यांचा प्रगट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच विष्णूवाडी, गजानन हॉस्पिटल जवळ असलेले मंदिर, तसेच सुंदरखेड परिसरामध्ये असलेल्या मंदिरांमध्ये इतर ठिकाणी भाविकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. शहरातील प्रमुख गजानन महाराज मंदिरांमध्ये जसे की विष्णूवाडी मधील गजानन महाराजांचे मंदिर, गजानन हॉस्पिटल जवळ असलेले गजानन महाराजांची मंदिर, व सुंदरखेड परिसरात महाराणा प्रताप नगर मध्ये असलेले गजानन महाराजांची मंदिर या ठिकाणी आज पहाटेपासूनच धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. ब्रह्ममुहूर्तावर महाराजांच्या मूर्तीला मंगलस्नान घालून षोडशोपचार पूजा आणि अभिषेक करण्यात आला. सुंदरखेड परिसरातील महाराणा प्रताप नगर मध्ये असलेल्या गजानन महाराज मंदिर येथे एक दिवसीय प्रवचन कार्यक्रम सुद्धा ठेवण्यात आला होता. दुपारी अनेक भागांतून महाराजांची देखणी पालखी काढण्यात आली. प्रगट दिनाचे मुख्य आकर्षण असलेल्या पिठलं-भाकरी आणि सावजी महाप्रसादाचे ठिकठिकाणी आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. महाराजांची शिकवण ही केवळ भक्तीपुरती मर्यादित नसून ती सेवेची आहे. त्यामुळेच आम्ही उत्सवासोबतच समाजोपयोगी उपक्रम राबवण्यावर भर दिला, ज्यामुळे संपूर्ण शहर शेगावमय झाल्याचे चित्र दिसून आले होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८